सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# भटके विमुक्त-धनगर-गुजर-बंजारा सारख्या अतिमागासांचा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागणार!

# केंन्द्रीय ओबीसी चे विभाजन एक उपाय

**- हरिभाऊ राठोड**

आज भारताच्या लोकसंख्येपैकी अर्ध्यापेक्षा जास्त (५२%) समाजाचा ओ.बी.सी. प्रवर्गात समावेश होतो. सद्यस्थितीत केंद्रीय व राज्य स्तरीय ओबीसी सुचिचे आरक्षणाच्या बाबतीत विभाजन केवळ आवश्यकच नाही तर अत्यावश्यक झाले आहे. भारताच्या घटनेमध्ये सामाजिक न्याय देण्यासाठी ज्या विशेष तरतूदी केल्या आहेत त्यांचे परिक्षण केल्यास असे लक्षात येईल की ओ.बी.सी यादीच्या विभाजनाची गरज आज जास्तच आहे. येथे आपण ब्राम्हणांसारख्या उच्च जातीचा किंवा अनुसुचीत जाती-जमातींचा विचार करीत नाही तर मंडल आयोगाकडून जाहिर झालेल्या इतर मागासवर्गीय व प्राप्त झालेल्या २७% आरक्षणाचे विभाजन झाले पाहिजे याचा विचार करतो. भारतीय राज्य घटनेचे मूलतत्त्व सर्व भारतीयांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देणे हे आहे. घटनेच्या प्रास्ताविकेमध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुत्व याचा समावेश आहे. घटनेच्या १४व्या कलमानुसार सरकार कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता नाकारणार नाही किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही, म्हणजेच कायद्यापुढे सर्व समान आहेत तसेच सर्वांना कायद्याचे समान संरक्षण लाभेल. याचा अर्थ असा की, असमान व्यक्तींना समान तऱ्हेने वागवता येणार नाही. असमान वर्गांची/ व्यक्तींची प्रगती व विकास व्हावा यासाठी उपाय योजले पाहिजेत. म्हणजेच सामाजिक व शैक्षणिक दृष्टया दबले गेले आहेत



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
बई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलूंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

हया मागास राहिलेल्या वर्गांना प्रगत वर्गांबरोबर आणले पाहिजे. घटनेच्या १६ (४) व १५ (४) या कलमांनुसार सामाजिक व आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गांच्या प्रगतीसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांच्यासाठी आरक्षण करणे, तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षण करणे यासाठी सरकारला खास अधिकार दिलेले आहेत.

भारत सरकारने घटनेच्या कलम ३४०च्या अंतर्गत १९५५ मध्ये काका कालेलकर आयोगाची स्थापना केली. या आयोगाने ज्या जातीचे लोक ओ.बी.सी. पेक्षाही वाईट व हलाखीचे जीवन जगत होते व त्यांची विमुक्त व भटक्या जातीमध्ये गणना केली होती, त्याचा समावेश ओ.बी.सी. मध्ये करण्याची शिफारस केली. भारत सरकारने या आयोगाचा अहवाल फेटाळला. ब्रिटीश सरकारने १८७१ साली गुन्हेगार जातींसाठी क्रिमीनल ट्राईब्स ॲक्ट हा कायदा केला होता. स्वातंत्र्यानंतर हा काळा कायदा रद्द करण्याची मागणी होऊ लागली, त्याच्या चौकशीसाठी १९४९ मध्ये भारत सरकारने अय्यंगार समितीची स्थापना केली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्यावेळी हा गुन्हेगारी जाती कायदा रद्द करण्यासाठी विधेयक संसदेत सादर केले गेले (१९५२), त्यावेळी बिहारच्या एका माननीय संसद सदस्य श्री. श्रीपाल सिंग यांनी असे निवेदन केले की, (२८ फेब्रुवारी १९५२) केवळ हा कायदा रद्द करणे पुरेसे होणार नाही; तर जोपर्यंत आपण या समाजाला अनुसूचित जाती जमातीप्रमाणे वेगळया तऱ्हेने नोकऱ्यामध्ये आरक्षण, शिक्षणात सुविधा व त्यासाठी अंदाज पत्रकात तरतूद करीत नाही, तोपर्यंत या समाजाला आपण सामाजिक न्याय देऊ शकणार नाही.

भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर अनेक राज्यांनी सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश, यासाठी मागासवर्गीयांना आरक्षण देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र सरकारने १९६१



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

ई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

मध्ये ओ. बी. सी. चे विभाजन करुन भटक्या विमुक्तांना वेगळे आरक्षण दिले. केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक संस्थामध्ये असे आरक्षण नव्हते त्यामुळे भारत सरकारने परत घटनेच्या कलम ३४० अन्वये मंडल आयोग स्थापना केली (१९७८) व या आयोगाने सामाजिक व शैक्षणिकरित्या मागासलेल्या समाजासाठी सरकारी सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षणाची शिफारस केली. (१९८०) त्याचबरोबर या वर्गांना शैक्षणिक सवलती, आर्थिक मदत, मूलभूत बदल व्हावेत यासाठीही शिफारस केली. ही शिफारस करताना मंडल आयोगाने घटनेच्या कलम १५(४) व १६ (४) अंतर्गत घालून दिलेल्या सामाजिक व शैक्षणिक आरक्षणाबाबतच्या कमाल मर्यादा व ओबीसीचे उप-वर्गीकरण याबाबत सर्वोच्च न्यायालयात घोषित केलेल्या त्या वेळचा कायदा ध्यानात घेतला होता. त्या आयोगाचे एक सदस्य श्री. एल. आर. नाईक यांनी या अहवालाच्या काही भागाबाबत मतभेद नोंदवला (डिसेंन्ट नोट). त्यांचे मत असे होते की, २७% आरक्षण सरसकट न देता राज्यांच्या या मागासवर्गीयांच्या यादीचे विभाजन करावे. एक मागासवर्गीय व दुसरे दबले गेलेले मागासवर्गीय, दबले गेलेले मागासवर्गीय म्हणजे प्रगत मागासवर्गीयांच्या तुलनेत अत्यंत मागासलेले वर्ग, परंतू आयोगाच्या सदस्यांपैकी बहुतेकांनी श्री. नाईक यांचे मत मान्य केले नाही.

मंडल आयोगाचे सन्मानीय सदस्य श्री. एल. आर. नाईक यांच्या मताकडे फारसे कुणाचेही लक्ष गेले नाही. या अहवालामध्ये श्री. नाईक यांनी असे मत व्यक्त केले होते की, ओ. बी. सी. मधील पुढारलेल्या जाती ओ.बी.सी मधीलच मागे पडलेल्या जातींना पुढे येऊ देत नाहीत. त्यामुळे भविष्यांत हे अत्यंत मागासलेल्या व अत्यंत टोकाच्या मागासलेल्या जाती संघटीत होतील व आपले नेतृत्त्व आपणच निर्माण करतील. परंतू जर असे झाले नाही, तर ओ. बी. सी. मधील अत्यंत मागासलेला वर्ग व विमुक्त भटक्या जाती व दबलेले मागासवर्ग केंद्रीय आरक्षणाचा लाभ उठवू शकणार नाहीत. महाराष्ट्रामध्ये

..३..

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

ई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

टाटा इन्स्टीटयूड ऑफ सोशल सायन्स यांच्या तसेच योजना आयोगाच्या शिफारसींनुसार १९६१ मध्ये ओ. बी. सी. ना विभागुन आरक्षण दिले आहे. याचा विमुक्त व भटक्या जातींनी थोडाफार महाराष्ट्रात फायदा घेतला आहे व आजही घेत आहेत.

मंडल आयोगाच्या शिफारसीनुसार २७% आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा शहाणी विरुध्द भारत सरकार या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, घटनेच्या कलम १६ (४) या तरतुदीसाठी मागासवर्गीयांचे, मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा कोणताही अडथळा नाही, असे वर्गीकरण हे सामाजिक दृष्टया किती मागासलेपण आहे त्यावर अवलंबून असते. विविध मागासवर्गीय यामध्ये समान वाटप होणे हे आवश्यक आहे की, ज्यायोगे एकत्रीकरण होऊन एक वा दोन वर्ग आरक्षणाचा सर्व वाटा स्वतःच घेऊन जाणार नाहीत.

सदर खटल्याच्या निकालाच्या ८०२ या परिच्छेदामध्ये माननीय न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की, मागासवर्गीयांचे, मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा किंवा कायद्याचा कोणताही अडथळा नाही. असे वर्गीकरण केलेच पाहिजे असा आग्रह ते धरत नाहीत. मात्र प्रश्नाचे उत्तर देताना ते इतकेच म्हणतात की, असे वर्गीकरण केल्यास ते वैध होईल. माननीय न्यायाधीशांनी दोन व्यावसायिक गटांचे उदाहरण दिले आहे. सोनार व वडार (पारंपारिकरीत्या दगड फोडणार) यांचे जर या दोघांनाही एकाच वर्गात घातले तर सोनारच सर्व सवलती लादतील व वडारांना काहीच राहणार नाही त्यामुळे शक्य असल्यास राज्य सरकारने इतर मागासवर्गीयांमध्ये सुध्दा वर्गीकरण करावे की ज्यामुळे मागासवर्गीयातील अधिक मागासवर्गीयानाही त्यांना देय असलेले लाभ मिळतील.

..४..

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

ई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने दिनांक २५.०४.२००५ रोजी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये केंद्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या यादीचे मागासवर्गीय व सर्वात जास्त मागासवर्गीय असे वर्गीकरण करावे असा ठराव पारित केला. तसेच आम्ही वारंवार मागणी करीत होतो त्याचप्रमाणे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार इतर मागाासवर्गीयाचे त्याच वर्गात उप-वर्गीकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगास अभ्यास करुन अहवाल व शिफारसी करण्यांस सांगण्यात आले. अहवाल व शिफारसी घटनेच्या ३४० कलमानुसार तसेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कायदा १९९३ नुसार सरकारला स्विकारणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगांनी शिफारसी सोबत एक चांगला अहवाल तयार करुन पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठवीला आहे (२ मार्च २०१५). मागासवर्गीय आरक्षणाचे विभाजन करुन खालील प्रमाणे तीन गटात उपवर्गीकरण करणे प्रस्तावित आहे. हे काम जर मोदी सरकारनी केले तर धनगरासारख्या शेकडो जातींना व विशेषत: देशभरातील ६६६ भटक्या विमुक्त जातींना सामाजिक न्याय मिळणार आहे. महाराष्ट्रातील केवळ धनगर नाही, तर राजस्थांनातील गुजर/बंजारा सारख्या जातीचा आरक्षणाचा जटील प्रश्न सुटणार आहे. आता बघायचे की, ज्यांना मागासवर्गीयाचा चेहरा भाजपानी देण्याचा प्रयत्न केला ते मोदी दुर्लक्षीत/पीडीत मागासवर्गीयांना न्याय देतात की त्यांच्यावर अन्याय करतात? राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगानी पुढीलप्रमाणे विभाजन सुचविले आहे.

१. **<u>आत्यंतिक (टोकाचे) मागासवर्गीय (अ वर्ग/ गट)</u>**:- या वर्गात समावेश करण्यासाठी इतर मागासवर्गीयांपैकी कोणत्या जाती / उप-जाती / जमाती सामाजिक तसेच शैक्षणिक व आर्थिक दृष्टया आत्यंतिक / टोकाचा मागासलेला आहे, हे शोधून काढले जाईल. त्यामध्ये खालील जाती / जमाती उप-जातींचा समावेश असेल. मूलवासी जाती, विमुक्त भटक्या व अर्ध-भटक्या



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
: ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

जाती इत्यादी याचे पारंपारिक व्यवसाय पुढील प्रमाणे होते / आहेत - भीक मागणे (भिकारी), डुकरे पाळणे, साप खेळवणे (गारुडी), पक्षी पकडणे (पारधी)-धार्मिक भिक्षू / साधू, ढोल बडवणारे, बांबूचे काम करणारे, शिकारी, खजूराच्या पानांपासून चट्या तयार करणारे मजूर, टोपल्या करणारे शेतमजूर, नावाडी इत्यांदीचा समावेश यामध्ये होतो.

२. **अधिक मागासलेले वर्ग (ब वर्ग):-** ज्या वर्गांचा गटांचा पारंपारिक व्यवसाय वस्त्रमाग व वस्त्रे रंगवण्याच्या यंत्रासाठी ब्रश करणे, रंगकाम करणे, बाहुल्या करणे, विणकाम करणे (विणकर), ताडी गाळणे, कापूस पिंजणे (पिंजारा), तेल गाळणे (तेली), कुंभार, मेंढया पाळणे (मेंढपाळ), (धनगर) मातीचे काम करणे, तागाचे (ज्यूट) काम करणे, पोती (बॅग) तयार करणे खाटिक, शिंपी, मच्छिमार कोळी, बागकाम करणे (माळी), गायन व नृत्य करणे (गायक व नर्तक), नाभिक, कुंकू, बांगड्या, रंग, मणी, सुया इत्यादी वस्तूमध्ये किरकोळ व्यवसाय करणे, मेंढया पाळणे असा होता / वा आहे, अशांचा समावेश यामध्ये होतो. तसेच ज्या अनुसुचित जाती-जमातींनी ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे ते व ज्यांचे वंशज, धोबी इत्यादींचा समावेश त्यामध्ये होतो.

३. **<u>मागासवर्गीय (गट क)</u>:-** वरील प्रमाणे आत्यंतिक/टोकाचे मागासलेले वर्ग व अधिक मागासलेले वर्ग शोधताना त्याचवेळी तुलनात्मकरीत्या प्रगत झालेले व पुढारलेले सूचित मागासवर्गीय गटातीलच मागासवर्गीय ओळखून काढणे ही या कामाची पुढची पायरी आहे. त्यामध्ये भू-धारक व शेती पिकवणाऱ्या जाती/जमाती, शेतकरी, व्यवसाय व उद्योग करणाऱ्या जाती-जमाती व तुलनात्मक दृष्टया पुढारलेल्या व प्रगत जाती / जमाती इ. यांचा समावेश या गटात होतो.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
ई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलूंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

या पूर्वी विमुक्त व भटक्या जातींचा विकास करण्यासाठी २००६ मध्ये बाळकृष्ण रेणके आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने आपला अहवाल भारत सरकारकडे २००८ मध्ये सोपविला. त्यामध्ये विमुक्त व भटक्या जमातीसाठी १०% आरक्षण देण्याची शिफारस भारत सरकारला केली होती. परंतू सरकारकडे या समाजाच्या लोकसंख्येची माहिती नसल्यामुळे या शिफारशींची अंमलबजावण होऊ शकली नाही. मात्र सरकारने २०११ साली सर्वच जातीतील व्यक्तींची संख्या, व त्यांचे आर्थिक, सामाजिक सर्वेक्षण केले व त्याचे आकडे सरकारकडे उपलब्ध आहे. २०१५ मध्ये भारत सरकारने दादा इदाते याच्या अध्यक्षतेखाली परत एक आयोग भटक्या विमुक्तांसाठी नेमला आहे. या आयोगाचे काम चालले आहे व अजून दोन वर्षे चालेल. या आयोगाने अंतरीम अहवाल सादर करावा व जी गोष्ट राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने उपस्थित केलेली आहे, त्याचे समर्थन केले जावे व देशात २७% ओ.बी.सी. आरक्षणाचे विभाजन केले जावे. ज्या सुविधा व सवलती अनुसूचित जाती / जमातींना दिल्या जातील त्याच आत्यंतिक (टोकाच्या) मागासवर्गीयांना दिल्या जाव्यात अशी आमची मागणी आहे.

ही गोष्ट आम्ही गेले २० वर्षे सांगत आलो आहोत. दिवंगत आमचे नेते गोपीनाथजी मुंडे, प्रमोदजी महाजन तसेच अडवाणीजी व अटलजींना हे मान्य होते. जेव्हापासून मंडल आयोग १९९३ मध्ये लागू झाला व तेव्हापासून जितके IAS/IPS/IFS उमेदवारांची भरती UPSC ने केली त्यामध्ये २७% आरक्षणाचा लाभ काही विशिष्ट राज्ये व काही विशिष्ट जाती उठवत आहेत.

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने ओ.बी.सी.च्या विभाजनाची जी शिफारस केली आहे व त्याची चर्चा चालली आहे, ती अत्यंत स्तुत्य आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या तत्वांचे पालन होईल. असे झाले तर आरक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराज यांनी जे धोरण आखले होते व जो

..७..

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
बई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

.सदस्य

विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

विचार केला होता तेच धोरण व तोच विचार राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने केला आहे असे आमचे मत आहे. या विषयावर ओ.बी.सी. मधील प्रगत जातीच्या नेत्यांनी राजकारण करु नये. ओ.बी.सी. मध्ये जे दबले गेलेले लोक आहेत त्यांना कर्पूरी ठाकूर सूत्र व वसंतराव नाईक सुत्र केवळ बिहारमध्ये व महाराष्ट्रात लावणे पुरेसे नाही, तर हे सूत्र पूर्ण देशभर लावले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाबाबत एक गोष्ट सांगितली होती की, एका टोपलीमध्ये एका दुबळया व एका सशक्त घोडयाला चणे खायला घातले तर सगळे चणे सशक्त घोडा एकटाच खाईल व दुबळया घोडयाला काहीच मिळणार नाही. हीच गोष्ट आज ओ.बी.सी. च्या २७% आरक्षणा बाबतीत होत आहे.

मी खासदार असतांना २००४ साली देशभर फिरुन या दबलेल्या लोकांना संघटीत करुन हीच विभाजनाची मागणी करीत होतो. २००८ मध्ये खासदार होतो, तेव्हा एक खाजगी विधेयक संसदेत सादर केले होते, त्याचा आशय असा होता की, केंद्र सरकार तसेच राज्य सरकार दोन्ही पातळीवर ओ.बी.सी. आरक्षणाचे विभाजन झाले पाहिजे. तसे झाले तर तो खरोखरच या दशकातील सामाजिक न्यायाचा सर्वांत मोठा मुद्दा ठरेल, कारण देशातील अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्येशी निगडीत हा मुद्दा आहे. भटके-विमुक्त, धनगर, गुजर, कोळी, महादेव कोळी या सारख्या अति मागास समाजाचा प्रश्न सोडवण्याचा एकमेव उपाय आहे.

**हरिभाऊ राठोड**
**माजी खासदार व महाराष्ट्र**
**राज्य विधानपरिषदेचे सदस्य**
**मो. ९९२०७१६९९९**



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
: ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570